गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दि.०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतेनुसार यादी.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः साजेसू-३७२६/प्र.क्र.२३/प्रशा-३,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीखः ०५ जून, २०२६

## शासन परिपत्रक

बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील “लिपिक टंकलेखक”, गट-क (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२२ शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.५८/का.१२, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ अन्वये अधिसूचित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील “लिपिक-टंकलेखक”, गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१८ व या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले सर्व नियम, आदेश आणि अनुदेश यांचे अधिक्रमित करुन तसेच बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील “लिपिक-टंकलेखक”, गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१७ यामध्ये सुधारणा करुन शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक, “गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१७ लागू करण्यात आलेले आहेत.

२. बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील “लिपिक टंकलेखक”, गट-क (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२२ शासन राजपत्रात प्रसिध्द होण्याच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ पुर्वी गट-ड मधील पद धारण करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे अशा व्यक्तींचा देखील दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ पासून पुढील पाच वर्षापर्यंत पदोन्नतीसाठी विचार करता येईल अशा प्रकारे सुधारणा शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.५८/का.१२, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ अन्वये करण्यात आलेली आहे.

३. यानुसार मंत्रालयीन विभागातील गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांपैकी, गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त व पदोन्नतीसाठी अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांची दि. ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतेनुसार यादी तयार करण्यात आली आहे.

४. सदर जेष्ठतेनुसार यादीमध्ये लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त व पदोन्नतीसाठी अर्ज केलेल्या, दि.०१.०१.२०२६ रोजी गट-ड या संवर्गात किमान ३ वर्षाची नियमित सेवा पुर्ण केलेल्या, पदवी अथवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व टंकलेखनाचे आवश्यक गती (प्रती मिनीट ४० शब्द इंग्रजी किंवा ३० शब्द मराठी) असल्याचे

नियमानुसार विहित केलेले प्रमाणपत्र (शासकीय वाणीज्य प्रमाणपत्र (गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट)) किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र धारण केलेल्या गट-ड मधील कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर ज्येष्ठतेनुसार यादी या परिपत्रकासोबत **परिशिष्ट 'अ'** येथे जोडण्यात आली आहे.

५. सदर ज्येष्ठतेनुसार यादी तयार करताना मुख्यत्वेकरुन महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतूदींचा अवलंब करण्यात आला आहे.

६. सर्व मंत्रालयीन विभागाना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतेनुसार यादी (दि. ०१.०१.२०२६ ची जेष्ठतेनुसार यादी- परिशिष्ट "अ") त्यांनी आपल्या विभागातील गट-ड संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त व पदोन्नतीसाठी अर्ज केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी. तसेच एखादया कर्मचाऱ्याचे नाव जेष्ठतेनुसार यादीत समाविष्ट करावयाचे राहीले असल्यास त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांनी विभागामार्फत निवेदन सादर करावे अशा सूचना त्यांना देण्यात याव्यात. कर्मचाऱ्यांच्या निवेदनातील वस्तुस्थिती/आक्षेपांची तसेच ज्येष्ठतेनुसार यादीतील स्तंभ ३ ते १५ मधील माहितीची काळजीपूर्वक तपासणी करुन ज्येष्ठतेनुसार यादीतील त्रुटी अथवा वास्तविक चुका (एखाद्या कर्मचाऱ्यांचे नाव जेष्ठतेनुसार यादीत समाविष्ट करणे राहीले असल्यास) संबंधित विभागांनी त्या कर्मचाऱ्यांच्या सेवापट व अन्य उपलब्ध अभिलेखावरुन तपासून विभागाच्या अभिप्रायांसह दिनांक ३० जून, २०२६ पूर्वी या विभागाच्या निदर्शनास आणाव्यात म्हणजे त्याची पडताळणी करुन ज्येष्ठतेनुसार यादीत आवश्यक ते बदल करणे शक्य होईल. अन्यथा संबंधितांस कोणतेही बदल सुचवावयाचे नाहीत असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल. दिनांक ३० जून, २०२६ नंतर आलेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

७. सर्व मंत्रालयीन विभागांनी ज्येष्ठतेनुसार यादीची प्रत वेबसाईटवरुन प्राप्त करुन घ्यावी तसेच आपल्या विभागातील गट-ड संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त व पदोन्नतीसाठी अर्ज केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना ज्येष्ठतेनुसार यादीची प्रत वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घेण्याबाबत कळवावे.

८. सदर परिपत्रक व ज्येष्ठतेनुसार यादी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक २०२६०६०५१२५१५४४०७ सांकेतांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AKSHATA KAMOSH DESAI

Digitally signed by AKSHATA KAMOSH DESAI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=59a95eb36d13ce00c8c8d9fda89857cd27a7e7709afd65d3a808b2e470f6e2d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E6B65A66BF0CB664DFEDA36F9154BCDD9D89AAA98B88B5A2EA5CD4774355699, cn=AKSHATA KAMOSH DESAI
Date: 2026.06.05 12:53:36 +05'30'

**( अक्षता देसाई )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र :- परिशिष्ट 'अ'**

**प्रति,**

सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना).
निवड नस्ती / कार्यासन प्रशा-३, संग्रहार्थ

शासन परिपत्रक क्रमांक साजेसू-३७२६/प्र.क्र. २३/प्रशा-३, दिनाक ०५ जून, २०२६ चे सहपत्र (परिशिष्ट "अ")

लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता धारण करीत असलेल्या व पदोन्नतीसाठी अर्ज केलेल्या मंत्रालयीन विभागातील गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती (Provisional) जेष्ठतेनुसार यादी

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | श्री / श्रीमती | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | विभागाचे नाव | कर्मचाऱ्याचा जात प्रवर्ग | गट-ड मधील नियुक्ती प्रवर्ग | जन्म दिनांक | गट-ड मधील नियुक्तीचा दिनांक | एसएससी अथवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मराठी ३० श.प्र.मि./इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र / संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | एमएससीआयटी संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक | लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी जेष्ठता दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | १ | श्री | प्रमोद विलास पवार | शिपाई | नविवि | भज (ब) | खुला | १९.१२.१९८२ | ०१.०२.२०२२ | २२.०६.१९९९ | १८.०२.२०२६ | ३१.०१.२००२ | २८.०४.२०२५ | ०२.०२.२०२५ | |
| २ | २ | श्री | कपिल मिलिंद बुडके | शिपाई | नियोजन विभाग | खुला | खुला | २३.१२.१९९९ | ०१.०२.२०२२ | ०८.०६.२०१५ | ०१.०२.२०२१ | ०४.०२.२०२५ | ०५.१०.२०१५ | ०२.०२.२०२५ | |
| ३ | ३ | श्री | स्वराज सुनिल शिलवंत | शिपाई | नियोजन विभाग | अजा | खुला | ०४.०९.१९९७ | ०२.०२.२०२२ | १७.०६.२०१४ | ३०.०७.२०२१ | १६.०८.२०२४ | ०४.०३.२०१४ | ०३.०२.२०२५ | |
| ४ | ४ | कु. | पूर्वा उमेश कापसे | शिपाई | पापुवस्ववि | खुला | खुला | ०८.०८.२००० | ०२.०५.२०२२ | ०९.०६..२०१६ | २७.१२.२०२१ | १६.०५.२०२३ | ०३.०८.२०१८ | ०३.०५.२०२५ | |
| ५ | ५ | श्री | विवेक दिनेश घाणेकर | शिपाई | मृवजवि | इमाव | खुला | १३.१०.२००३ | ०६.०७.२०२२ | ०८.०६.२०१९ | २२.०५.२०२४ | २०.१०.२०२२ | २६.०४.२०२१ | ०७.०७.२०२५ | |
| ६ | ६ | श्री | ह्रषिकेश काशिनाथ संखे | शिपाई | नियोजन विभाग | भज (ड) | खुला | १८.११.२००१ | ११.११.२०२२ | ०१.०६.२०१७ | ०३.०७.२०२४ | १८.०४.२०२३ | ११.०९.२०१७ | १२.११.२०२५ | |